तेथ हरू म्हणे जेवी नेणिजे | देवी जैसे का स्वरूप तुझे | हे नित्य नूतन देखिजे | गीता तत्व || ७१|१|ज्ञा.

शंकर पार्वतीला गीता समजवून सांगता आहेत असा प्रसंग. तेव्हा ते पार्वतीला म्हणतात “तुझ्या स्वरूपाचा थांग पत्ता लागत नाही तसेच ही गीता दरवेळा बघतो. तेव्हा काहीतरी नवीन सापडते.” “पाण्या तुझा रंग कसा, ज्याला पाहिजे तसा” अशी जी म्हण आहे तशी गीता आहे आणि हीच तिची ख्याति आहे. ही असली ख्याति शंकर महाराजांच्या तोंडातून सांगण्यामागे एक उद्देश आहे. ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा शैवसंप्रदायाची. स्वतःच्या गुरूच्या निवृत्तीनाथांच्या आज्ञेमुळे वैष्णवांची दाट छाया असलेल्या गीतेवर निरुपण करावयाचे आहे. हा थोडाफार पक्षबदलच झाला. पण परंपरा घट्ट म्हणून शंकराकडून ही गीतेची स्तुती शंकर पार्वती ही दैवते भारतातली आदिम, पूर्वे कडची, पार्वती हिमालयाची मुलगी आणि शंकर जावई. हे जोडपे विलक्षणच. शंकर रागीट, डोक्यात राख घालून घेणारा त्याच्या प्रेमात ही श्रीमंत बापाची मुलगी पडली. ही स्वतःचे व्यक्तिमत्व जपणारी. ती शंकराच्या पायाशी बसत नाही. त्याच्या शेजारी उभी असते. त्या उलट विष्णू सौम्य पण मुत्सद्दी, व्यवहारात पारंगत समाज उत्क्रांत झाल्यावर आणि आर्थिक उन्न्तावास्थेचे प्रतिनिधित्व करणारी लक्ष्मी विष्णूच्या पायाशी बसलेली दाखवतात हा सूक्ष्म फरक नोंद घेण्याजोगा आहे. भारताच्या पश्चिमेला सांगितली गेलेली गीता ही ज्या श्रीकृष्णाने सांगितली तो विष्णूचा अवतार आहे. आणि त्याला अनेक स्त्रिया अंकित आहेत अशीच वातावरण निर्मिती करण्यात आली आहे. आदिम अवस्थेमधून आणि स्त्रीवादी पार्वतीच्या काळानंतर पुरुषप्रधान संस्कृतीच्या कालखंडात महाभारत आणि गीतेचा जन्म झाला आहे. हे ध्यानात घेतलेले बरे. पुणे शहरातल्या खैर नावाच्या विद्वानाने गीतेचे पृथ:करण करून ती प्रथम कर्मयोग प्रधान होती, मग त्यात ज्ञानाची पेरणी करण्यात आली आणि मग ती लोकांना रुचेल पचेल आणि जचेल अशी करण्यासाठी त्यात भक्तीचा प्रवेश झाला आणि ही भक्ती श्रीकृष्णाची असल्यामुळे सामान्य जनांना ती पसंत पडली असा जो निर्णय केला आहे, तो मोठा वेधक आहे. ज्या सौती ऋषीने आपल्या हातात सध्या असलेली गीता संकलित केली असे म्हणतात तो एकदा वैतागून म्हणाला होता. “मी ओरडून सांगतो आहे की गीतेतला संदेश बघा पण कोणी ऐकत नाही” श्रीकृष्ण प्रवेशामुळे लोकांनी गीतेकडे लक्ष द्यायला सुरुवात केली हेच खरे. गीता का सांगावी लागली ते पुढच्या लेखात.

३२२ शब्द